RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ९६] बुधवार, ऑक्टोबर २०, २०२१/आश्विन २८, शके १९४३ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २० ऑक्टोबर २०२१

**अधिसूचना**

**अंतर्देशीय जलयान अधिनियम, १९१७**

क्रमांक- ममेबो. ०७१७/प्र.क्र.१४०/बंदरे-२.—अंतर्देशीय जलयान अधिनियम, १९१७ (१९१७ चा १) याच्या कलम २९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त कलमान्वये अंतर्देशीय जलयान परीक्षेच्या बाबतीत केलेले पूर्वीचे सर्व नियम काढलेले आदेश किंवा परिपत्रके यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, सक्षमता प्रमाणपत्रे देण्याचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती :—

(क) या नियमांना महाराष्ट्र अंतर्देशीय जलयान परीक्षा (सक्षमता प्रमाणपत्र देण्याबाबत) नियम, २०१९ असे म्हणावे.

(ख) ते संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असतील.

२. पात्रतेचे निकष :—

(१) डेक विभाग :—

(एक) अशी कोणताही व्यक्ती, सारंग परीक्षेला बसण्यास पात्र असेल. जी व्यक्ती,—

(क) एकवीस वर्षा पेक्षा कमी वयाची नसेल ;

(ख) जिने इयत्ता ८ वी उत्तीर्ण ही किमान अर्हता धारण केलेली असेल;

(ग) जिने ४० बीएचपीपेक्षा कमी नसेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावर लास्कर किंवा खलाशी किंवा सीमन म्हणून किमान तीन वर्षांचा सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल ;

**किंवा**

जिने ४० बीएचपीपेक्षा कमी असेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावर लास्कर किंवा खलाशी किंवा नाविक सीमन म्हणून किमान सहा वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल.

(दोन) अशी कोणताही व्यक्ती द्वितीय श्रेणी मास्टर परीक्षेला बसण्यास पात्र असेल,जी व्यक्ती,—

(क) एकवीस वर्षां पेक्षा कमी वयाची नसेल;

(ख) जिने इयत्ता ८ वी उत्तीर्ण ही किमान अर्हता धारण केलेली असेल;

(ग) सारंग म्हणून सक्षमता प्रमाणपत्र धारण केलेल असेल;

(घ) सारंग म्हणून किमान तीन वर्षे इतक्या सेवेचा अनुभव धारण केलेला असेल, त्यापैकी एक वर्षाचा अनुभव हा २२६ बीएचपीपेक्षा कमी नसेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावरिल सागरी सेवेचा असेल ;

**किंवा**

जिने ४० बीएचपीपेक्षा कमी नसेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावरिल सहा वर्षे इतक्या सारंग सेवेचा अनुभव धारण केलेला असेल.

(तीन) अशी कोणतीही व्यक्ती प्रथम श्रेणी मास्टर परीक्षेला बसण्यास पात्र असेल, जी व्यक्ती,—

(क) एकवीस वर्षां पेक्षा कमी वयाची नसेल;

(ख) जिने इयत्ता ८ वी उत्तीर्ण ही किमान अर्हता धारण केलेली असेल;

(ग) जिने द्वितीय श्रेणी मास्टर सक्षमता प्रमाणपत्र धारण केलेले असेल आणि;

(घ) जिने २२६ बीएचपीपेक्षा कमी नसेल इतक्या क्षमतेच्या अतर्देशीय जलयानावरिल द्वितीय श्रेणी मास्टर म्हणून किमान दोन वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने द्वितीय श्रेणी मास्टर म्हणून सक्षमता प्रमाणपत्र धारण केल्यानंतर ४० बीएचपीपेक्षा कमी नसेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावरिल पाच वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने व्यापारी मर्चंट शिपिंग अ‍ॅक्ट, १९५८ (१९५८ चा ४४) अन्वये द्वितीय श्रेणी मेट सक्षमता प्रमाणपत्र धारण केल्यानंतर द्वितीय श्रेणी मेट म्हणून सागरी सेवेचा एक वर्ष इतका अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४४) अन्वये प्रथम श्रेणी मेट सक्षमता प्रमाणपत्र धारण केल्यानंतर द्वितीय श्रेणी मेट म्हणून सागरी सेवेचा सहा महिने इतका अनुभव धारण केलेला असेल.

(२) इंजिन विभाग :—

(एक) अशी कोणतीही व्यक्ती, द्वितीय श्रेणी इंजिन चालक परीक्षेला बसण्यास पात्र असेल, जी व्यक्ती,—

(क) एकवीस वर्षां पेक्षा कमी वयाची नसेल;

(ख) जिने इयत्ता ८ वी उत्तीर्ण ही किमान अर्हता धारण केलेला असेल आणि;

(ग) जिने ४० बीएचपीपेक्षा कमी नसेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावरील इंजिन कक्षामध्ये किमान चार वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने ४० बीएचपीपेक्षा कमी असेल इतक्या क्षमतेच्या अंतर्देशीय जलयानावरील खलाशी किंवा नाविक सीमन म्हणून सहा वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल.

(दोन) अशी कोणतीही व्यक्ती प्रथम श्रेणी इंजिन चालक परीक्षेला बसण्यास पात्र असले,जी व्यक्ती,—

(क) एकवीस वर्षां पेक्षा अधिक वयाची असेल;

(ख) जिने इयत्ता ८ वी उत्तीर्ण ही किमान अर्हता धारण केलेली असेल;

(ग) द्वितीय श्रेणी इंजिन चालक म्हणून सक्षमता प्रमाणपत्र धारण केलेले असेल; आणि;

(घ) जिने ५६५ बीएचपी व त्याहून अधिक क्षमता असलेल्या अंतर्देशीय जलयानावरिल इंजिन चालक म्हणून किमान दोन वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने २२६ बीएचपी व त्याहून अधिक क्षमता असलेल्या अंतर्देशीय जलयानावरिल इंजिन चालक म्हणून तीन वर्षे व त्याहून अधिक सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने ११० बीएचपी किंवा त्याहून अधिक क्षमता असेलल्या अंतर्देशीय जलयानावरील इंजिन चालक म्हणून चार वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने ८५ बीएचपी किंवा त्याहून अधिक क्षमता असलेल्या अंतर्देशीय जलयानावरील इंजिन चालक म्हणून पाच वर्ष इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल.

(तीन) अशी कोणताही व्यक्ती अंतर्देशीय जलयानाचा अभियंता परीक्षेस बसण्यास पात्र असेल,जी व्यक्ती,—

(क) एकवीस वर्षांपेक्षा कमी वयाची नसेल;

(ख) जिने इयत्ता ८ वी उत्तीर्ण ही किमान अर्हता धारण केलेली असेल;

(ग) जिने प्रथम श्रेणी इंजिन चालक म्हणून सक्षमता प्रमाणपत्र धारण केलेली असेल आणि;

(घ) जिने ५६५ बीएचपी किंवा त्याहून अधिक क्षमता असलेल्या अंतर्देशीय जलयानावरील प्रथम वर्ग इंजिन चालक म्हणून किमान तीन वर्षे इतक्या सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने ३९५ बीएचपी किंवा त्याहून अधिक क्षमता असलेल्या अतंर्देशीय जलयानावरिल प्रथम श्रेणी इंजिन चालक म्हणून पाच वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल;

**किंवा**

जिने २२६ बीएचपी किंवा त्याहून अधिक क्षमता असलेल्या अंतर्देशीय जलयानावरिल नौकानयन इंजिन चालक (एसजीईडी) म्हणून सक्षमता प्रमाणपत्र धारण केल्यानंतर इंजिन चालक म्हणून दोन वर्षे इतक्या सागरी सेवेचा अनुभव धारण केलेला असेल.

(३) सर्व श्रेणीच्या परीक्षांसाठी उमेदवारांकडे नौवहन महानिर्देशालयात मान्यता दिलेल्या संस्थेचे पुढील प्रमाणित पाठ्यक्रमांचे किमान एक प्रमाणपत्र असेलः—

(एक) मूलभूत प्रथमोपचार (इएफए)

(दोन) उत्तर जीवित्व (survival) तंत्रातील नैपुण्य (पी.एस.टी)

(तीन) वैयक्तिक सुरक्षा व सामाजिक जबाबदारी (पी.एस.एस.आर)

(चार) आग प्रतिबंधक आणि अग्निशमन (एफ.पी.एफ.एफ)

(पाच) सुरक्षा कर्तव्यांसह सुरक्षाविषयक प्रशिक्षण (एस.टी.एस.डी.एस.डी)

(४) सर्व श्रेणींच्या परीक्षांसाठी उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे, दृष्टी चाचणी, रातआंधळेपणा व वर्णांधता नसल्याचे नौवहन महानिर्देशालयाने मान्यता दिलेल्या वैद्यकीय चिकित्सकाचे वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करतील.

**३.** परीक्षा शुल्क .— सर्व परीक्षांचे शुल्क खालीलप्रमाणे असेलः—

| अ.क्र. | श्रेणी | निर्धारण फी | परीक्षा फी रू. |
|---|---|---|---|
| १ | प्रथम श्रेणी मास्टर | रुपये सहाशे | रुपये दोन हजार चारशे पन्नास |
| २ | द्वितीय श्रेणी मास्टर | रुपये सहाशे | रुपये एक हजार सहाशे पन्नास |
| ३ | सारंग | रुपये सहाशे | रुपये एक हजार दोनशे पन्नास |
| ४ | अंतर्देशीय जलयान अभियंता | रुपये सहाशे | रुपये दोन हजार सहाशे पन्नास |
| ५ | प्रथम श्रेणी इंजिन चालक | रुपये सहाशे | रुपये एक हजार सातशे पन्नास |
| ६ | द्वितीय श्रेणी इंजिन चालक | रुपये सहाशे | रुपये एक हजार तिनशे पन्नास |

**४.** सक्षमता प्रमाणपत्र देण्याबाबतची फी .— सर्व श्रेणीकरिता उमेदवारांनी दिलेल्या पत्त्याच्या पुराव्याच्या आधारे सक्षमता प्रमाणपत्र देण्यासाठी व ते पाठविण्यासाठी रुपये चारशे पन्नास इतकी फी असेल.

**५.** सक्षमता प्रमाणपत्राची दुबार प्रत देण्याबाबतची फी .— प्रमाणपत्राची किंवा लायसन्सची दुबार प्रत देण्यासाठी रूपय एक हजार इतकी फी असेल.

**६.** सर्वसामान्य सूचना —

(क) (एक) अंतर्देशीय जलयान अधिनियम, १९१७ (१९१७ चा १) यान्वये इतर राज्याकडून देण्यात आलेले द्वितीय श्रेणी इंजिन वाहकाचे सक्षमता प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्रात अंतर्देशीय जलयान परीक्षेच्या उच्च श्रेणीच्या परीक्षेला बसण्याची परवानगी आहे. मात्र, त्यांनी वर नमूद केलेल्या इतर सर्व निकषांची पूर्तता केलेली असली पाहिजे,

(दोन) अंतर्देशीय जलयान अधिनियम, १९१७ अन्वये इतर राज्याकडून देण्यात आलेले सारंगचे सक्षमता प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्रात अंतर्देशीय जलयान परीक्षेच्या परीक्षेला बसण्याची परवानगी आहे. परंतु, त्यांनी वर नमूद केलेल्या इतर सर्व निकषांची पूर्तता केलेली असली पाहिजे. उमेदवाराने महाराष्ट्र राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावर चालणारे अंतर्देशीय जलयान चालविण्यास, यथोचितरित्या अर्हता असणाऱ्या मास्टरच्या प्रभाराखाली महाराष्ट्र राज्याच्या सागरी किनाऱ्यावरचे अंतर्देशीय जलयानावर किमान ६ महिन्यांच्या कालावधीसाठी काम केलेले असावे.

(ख) मास्टर, सारंग, अभियंता, इंजिन चालक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना पहिल्यांदाच देण्यात येणारी सर्व सक्षमता प्रमाणपत्रे पाच वर्षांच्या कालावधीकरिता वैध असतील.

(ग) अंतर्देशीय जलयान अधिनियम, १९१७ अन्वये दिलेले सक्षमता प्रमाणपत्र संपूर्ण भारतभर अंमलात असेल.

(घ) (एक) सर्व उमेदवारांनी उच्च श्रेणीसाठी सक्षमता प्रमाणपत्र देण्यासाठी पात्र ठरण्याकरिता लेखा व मौखिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(दोन) लेखी व मौखिक या दोन्ही परीक्षांसाठी उत्तीर्ण होण्याकरीता प्रत्येकी पन्नास गुण आवश्यक असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. मो. होळकर,**
शासनाचे सह सचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 20th October 2021.

*NOTIFICATION*

INLAND VESSELS ACT, 1917.

MMB-0717/Cr. No.140/Port-2 .— In exercise of the powers Conferred by section 29 of the Inland Vessels Act, 1917 (1 of 1917) and in supersession of all previous rules, orders or Circulars issued regarding Inland Vessels Examination under said section and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, hereby makes the following rules to regulate the granting of certificates of competency, namely :—

1. *Short Title and Extent.—*

*(a)* These rules may be called the Maharashtra (Grant of Certificates of Competency) Inland Vessels Examination Rules, 2019.

*(b)* It extends to the whole of the State of Maharashtra.

2. *Eligibility Criteria.—*

(1) Deck Department :—

*(i)* A person shall be eligible for Serang examination, who,—

*(a)* is not less than twenty-one years of age;

*(b)* possesses minimum qualification as 8th pass;

*(c)* possesses a minimum sea service of three Years of sea service as lascar or Khalashi or seaman on Inland vessel not less than 40 BHP

*or*

Six years for less than 40 BHP.

*(ii)* A person shall be eligible for 2nd Class Master Examination, who,—

*(a)* is not less than twenty-one years of age;

*(b)* possesses minimum qualification as 8th pass;

*(c)* is in possession of certificate of competency as Serang;

*(d)* possesses a minimum sea service of three years as serang (In which one year of sea service on Inland vessel not less than 226 BHP)

*or*

Six years on Inland vessel not less than 40 BHP.

(*iii*) A person shall be eligible for 1st Class Master examination, who,—

(*a*) is not less than twenty-one years of age;

(*b*) have possesses a minimum qualification as 8th pass;

(*c*) are in possession of certificate of competency as 2nd Class Master; and

(*d*) possesses a minimum sea service of two years as 2nd Class Master on Inland vessel not less than 226 BHP

*or*

Five years sea service after holding CoC as 2nd class Master on Inland vessel not less than 40 BHP

*or*

One year sea service as 2nd Mate after obtaining certificate of competency of 2nd Mate under the Merchant Shipping Act, 1958 (44 of 1958)

*or*

Six months sea service as 2nd Mate after obtaining certificate of competency of 1st Mate under the Merchant Shipping Act, 1958 (44 of 1958)

(2) *Engine Department :—*

*(i)* A person shall be eligible for 2nd Class Engine Driver examination, who.—

*(a)* is not less than twenty-one years of age;

*(b)* has possesses a minimum qualification as 8th pass; and

*(c)* possesses a minimum sea service of four Years in Engine Room on Inland vessel not less than 40 BHP

*or*

Six years as Khalashi or Seaman on Inland vessel not less than 40 BHP.

*(ii)* A person shall be eligible for 1st Class Engine Driver examination, who,—

*(a)* is more than 21 years of age;

*(b)* has possesses a minimum qualification as 8th pass;

*(c)* are in possession of Certificate of Competency as 2nd Class Engine Driver; and

*(d)* possesses a minimum sea service of two years as Engine Driver on Inland vessel having 565 BHP and above

*or*

Three years as Engine Driver on Inland vessel having 226 BHP and above

*or*

Four years as Engine Driver on Inland vessel having 110 BHP and above

*or*

Five years as Engine Driver on Inland vessel having 85 BHP and above.

*(iii)* A person shall be eligible for an Engineer of Inland vessels examination, who,—

*(a)* is not less than twenty-one years of age;

*(b)* has possesses a minimum qualification as 8th pass;

*(c)* are in possession of certificate of competency as 1st Class Engine Driver; and

*(d)* possesses a minimum sea service of, three years as 1st Class Engine Driver on Inland vessel having 565 BHP and above

*or*

Five years as 1st Class Engine Driver on Inland vessel having 395 BHP and above

*or*

Two years sea service as Engine Driver after getting the certificate of competency as Sea Going Engine Driver (SGED) on Inland vessel having 226 BHP and above.

(3) Candidates for all grades of examinations should have a minimum of following modular courses certificate from a DG Shipping approved institute:—

(*i*) Elementary First Aid (EFA);

(*ii*) Proficiency in Survival Techniques (PST);

(*iii*) Personal Safety and Social Responsibilities (PSSR);

(*iv*) Fire Prevention and Fire Fighting (FPFF);

(*v*) Security Training for Seafarer with Designated Security Duties (STSDSD)

(4) Candidates for all grades of examinations shall submit Medical Fitness Certificate from a DG Shipping approved medical examiner, providing status on physical fitness, Eyesight test, good night vision and no color blindness.

3. *Examination Fees.*— The examination fees for all grades of examinations, shall be as mentioned in the Table below :—

TABLE

| Sr. No. | Grade | Assessment Fees | Examination Fees |
|---|---|---|---|
| 1 | First Class Master | Rupees Six Hundred | Rupees Two Thousand Four Hundred Fifty. |
| 2 | Second Class Master | Rupees Six Hundred | Rupees One Thousand Six Hundred Fifty. |
| 3 | Serang | Rupees Six Hundred | Rupees One Thousand Two Hundred Fifty. |
| 4 | Engineer of Inland Vessel | Rupees Six Hundred | Rupees Two Thousand Six Hundred Fifty. |
| 5 | First Class Engine Driver | Rupees Six Hundred | Rupees One Thousand Seven Hundred Fifty. |
| 6 | Second Class Engine Driver | Rupees Six Hundred | Rupees One Thousand Three Hundred Fifty. |

4. *Fees for issuance of Certificate of Competency.*— For issuance and dispatch of certificate of competency for all grades on the address proof provided by candidates shall be Rupees Four Hundred Fifty.

5. Fees for issuance of duplicate copy of certificate of competency. — The fees for the duplicate copy of the certificate or license shall be Rupees One Thousand.

6. *General instruction* .—

(A) *(i)* Candidates having certificate of competency as 2nd Class Engine Driver issued by other States under the Inland Vessels Act, 1917 (1 of 1917) are permitted to appear for next higher grade of Inland Vessel Examination at Maharashtra, provided they meet all other aforementioned criteria.

*(ii)* Candidates having certificate of competency as Serang issued by other states under the Inland Vessels Act, 1917 are permitted to appear for next higher grade of Inland Vessel Examination at Maharashtra, provided they meet all other aforementioned criteria and the candidate serves for a minimum period of 6 months on an inland vessel plying in the coast of Maharashtra State under the charge of a Master duly qualified to command an Inland Vessel plying within the coast of Maharashtra State.

(B) All Certificates of Competency issued for the first time to the candidates who pass the Masters, Serang, Engineers, Engine Drivers examination shall be valid for a period Five years.

(C) A Certificate of Competency granted under the Inland Vessels Act, 1917 shall have effect throughout the India.

(D) (*i*) All candidates are required to pass the written and oral exam to be eligible for issuance of Certificate of Competency for next higher grade.

(*ii*) The passing marks for both written and oral examinations shall be Fifty percent each.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. M. HOLKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.